आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ४.०० वाजता

१६ एप्रिल २०२४ - मंगळवार

भाजपानं सातारा लोकसभा मतदारसंघातून छत्रपती उदयनराजे भोसले यांना उमेदवारी आज जाहीर केली. गुरुवारी अर्ज भरणार असल्याचं आज त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

दरम्यान, सोलापूर लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांनी आज अर्ज भरला. त्यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनीही आज अर्ज भरला. माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनीही आज अर्ज भरला.

कोल्हापुरातून काँग्रेस उमेदवार शाहू महाराज यांनीही आज उमेदवारी अर्ज भरला. हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांनीही आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

काँग्रेसचे नेते विशाल पाटील यांनी बंडखोरी करत सांगली लोकसभा मतदारसंघासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. एक अपक्ष आणि एक काँग्रेसचा उमेदवार असे म्हणून त्यांनी अर्ज दिले. शुक्रवारपर्यंत काँग्रेसचा एबी फॉर्म मिळाला नाही तर अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्धार विशाल पाटील यांनी केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज मशाल गीताचं अनावरण केलं.

**<><><><>**

गडचिरोलीतल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील अशा ६८ मतदान केंद्रांवरचे ७२ निवडणूक पथकातले २९५ मतदान अधिकारी आणि कर्मचारी आज मतदान केंद्रावर रवाना झाले. ईव्हीएम आणि इतर युनिटसह आज सकाळी भारतीय वायुसेना आणि भारतीय लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीनं ते बेसकॅम्पवर पोहोचले.

**<><><><>**

चित्रपट अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणी काल पोलिसांनी दोन आरोपींना गुजरामधून अटक केली. न्यायालयानं त्यांना १० दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. विक्की गुप्ता आणि सागर पाल अशी अटक केलेल्यांची नावं आहेत. रविवारी सलमान खानच्या घरावर गोळीबार केल्यानंतर हे दोघं फरार झाले होते.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगानं नागरी सेवा परीक्षा २०२३ चे अंतिम निकाल जाहीर केले आहे. त्यात आदित्य श्रीवास्तव पहिला, अनिमेष प्रधान दुसरा, तर दोनुरु अनन्या रेड्डी तिसऱ्या क्रमाकांवर आहे. आदित्य श्रीवास्तव हा आयआयटी कानपूरचा विदयुत अभियांत्रिकी पदवीधर आहे.

या परीक्षेला ६ लाखापेक्षा जास्त उमेदवार बसले होते. आयोगानं एकूण १ हजार १६ उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. त्यात ३५२ मुलींचा समावेश आहे. पहिल्या २५ जणांमधे १० मुलींचा समावेश आहे.

<><><><><>

नाशिक शहरात स्वाईन फ्लूचे दोन रुग्ण आढळले. तर सिन्नर तालुक्यातल्या दातलीमध्ये स्वाइन फ्लूमुळे एका महिला रुग्णाचा मृत्यू झाल्याची माहिती महापालिकेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी चव्हाण यांनी दिली.

<><><><><>

हिंगोलीतल्या बाजार समितीच्या हळद मार्केट यार्डात काल २० हजार क्विंटल हळदची आवक झाली. यंदाच्या वर्षातील ही विक्रमी आवक आहे. विक्रीसाठी आलेल्या हळदीच्या मोजमापासाठी चार दिवसांचा कालावधी लागणार आहे.

दरम्यान, क्विंटलमागं हळदीच्या भावात जवळपास पाचशे रुपयांची घसरण झाल्याचं शेतकऱ्यांनी सांगितलं.

<><><><>

बीड जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसानं दीड हजार हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. वादळी वाऱ्यामुळे आणि वीज पडून गेवराई तालुक्यातल्या एकाचा, तर आष्टी तालुक्यातल्या दोघांचा अशा तीन व्यक्तींचा मृत्यू झाला. लहान ७ आणि मोठ्या  १५ अशा २२ जनावरांचाही वीज पडून, झाड अंगावर पडून मृत्यू झाला. सर्वाधिक नुकसान वडवणी तालुक्यात झालं आहे. धारूर, अंबाजोगाई आणि बीड तालुक्यात देखील मोठं  नुकसान झालं  आहे. या पीकांचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

<><><><>

नाशिक जिल्ह्यात काल उच्चांकी तापमानाची नोंद झाल्यावर संध्याकाळी अनेक तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस झाला. त्यामुळं  शेतपिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. कळवण तालुक्यातल्या  पिळकोस, भादवण, बेज, बगडू परिसरात रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावल्यानं  पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं.  काढणीला  आलेला उन्हाळी कांदा पूर्णपणे भिजला.

<><><><>

इस्राइल-इराणमधल्या संघर्षामुळं देशातल्या शेअर बाजारात आजही मोठी घसरण झाली. सेन्सेक्स ४५६ अंकांनी घसरुन ७२ हजार ९४४ अंकांवर बंद झाला. निफ्टी सव्वाशे अंकांनी घसरुन २२ हजार १४८ अंकांवर बंद झाला.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्या सामना होणार आहे. कोलकत्यामध्ये रात्री साडे ७ वाजता ईडन गार्डनवर हा सामना सुरू होईल.

बेंगळुरूमध्ये काल झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबानं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा २५ धावांनी पराभव केला.

<><><><><>

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये  येत्या २४ तासांत उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता  हवामान विभागानं वर्तवली आहे.  सांताक्रूझ भागात ३७ पूर्णांक ९  अंश सेल्सिअस , कुलाबा इथं ३४  पूर्णांक ७ अंश सेल्सिअस तर ठाण्यात ४१ अंश सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद झाली.

//<><><><><>//